# श्रीमती नाथीबाई दामोदर ठाकरसी महिला विद्यापीठ, मुंबई-४०० ०२०

## दहा नोंदणीकृत पदवीधारकांची अधिसभेवरील निवडणूक-२०१७

## जाहीर प्रकटन

### नवीन पदवीधारकांच्या नोंदणी / नोंदणीकृत पदवीधारकांच्या तपशिलातील बदल आणि नोंदणीकृत पदवीधारकांच्या अधिसभेवरील निवडणूकीसाठी मतदार यादीत समावेश

सदर विद्यापीठाच्या पदवीधारकांच्या माहितीसाठी याद्वारे सूचित करण्यात येते की,महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम,२०१६ च्या कलम २८ ( टी) नुसार विद्यापीठाच्या अधिसभेवर दहा नोंदणीकृत पदवीधारकांच्या निवडणूकीची तरतूद आहे.

ज्याअर्थी, महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ च्या कलम १३१ (१) आणि उपकलम (२) च्या तरतूदींच्या आधारे खालील व्यक्ती या नोंदणीकृत पदवीधारकांच्या नोंदणीसाठी किंवा नोंदणीकृत पदवीधारकांच्या नोंदणीसाठी पात्र समजण्यात येईल ते असे:

अ) ज्या एसएनडीटी महिला विद्यापीठाच्या पदवीधारक आहेत,

ब) नवीन स्थापन करण्यात आलेल्या विद्यापीठाच्या मूळ विद्यापीठाकडून ज्या पदवीधारक आहेत.

पदवीधारकांच्या नोंदवहीमध्ये किंवा नोंदणीकृत पदवीधारकांच्या बदललेल्या तपशिलाची नोंद होण्यासाठीची प्रक्रिया खालीलप्रमाणे आहे.

१. पदवीधारक नोंदणीसाठी / नोंदणीकृत पदवीधारकांच्या तपशिलातील बदलाच्या नोंदणीसाठी विहित नमुन्यातील अर्ज विद्यापीठ संकेतस्थळ www.sndt.ac.in ('इलेक्शन पोर्टल 'पाहा) वर उपलब्ध आहेत.

२. नोंदणीकरणाच्या शुल्कासाठी रु.२०/- चा "The Registrar, SNDT Women's University" यांच्या नावे मुंबई येथे देय असलेला डिमांड ड्राफ्ट किंवा इंडियन पोस्टल ऑर्डरद्वारे किंवा विद्यापीठ लेखा विभाग, चर्चगेट परिसर, मुंबई ४०० ०२० येथे प्रत्यक्ष रोख जमा करण्यात यावी.

३. नवीन नोंदणीकरणासाठी / नोंदणीकृत पदवीधारकांच्या तपशिलातील बदलाकरीता अर्जासोबत खालील कागदपत्रांच्या साक्षांकित प्रती जोडाव्यात.

   i. पदवी प्रमाणपत्र,

   ii. निवासाचा पुरावा (आधारकार्ड ,पॅन कार्ड, इलेक्शन कार्ड, पासपोर्ट, विजेचे बिल आणि वाहन चालक परवाना यापैकी कोणतेही एक).

४. जर नावामध्ये कोणताही बदल असल्यास संबंधित सरकारी राजपत्राची किंवा नवीन नाव असलेल्या आधार कार्डाची प्रत जोडण्यात यावी.

५. आवश्यक कागदपत्रासह पूर्ण भरलेले आवेदन अर्ज आणि विहित शुल्क, कुलसचिव, एस.एन.डी.टी. महिला विद्यापीठ, चर्चगेट कॅम्पस, मुंबई- ४०० ०२० यांच्याकडे सादर करावे.

६. आवेदन अर्जाच्या सादरीकरणाची अंतिम मुदत दिनांक ५ जुलै, २०१७ रोजी सायं. ५.०० वाजेपर्यंत राहील.

७. नोंदणीकृत पदवीधारकांच्या मतदार यादीत समावेश करण्यासाठी नोंदणीकृत पदवीधारकांनी (अर्ज 'बी 'भरावा. नमुना अर्ज www.sndt.ac.in या संकेतस्थळावरील 'इलेक्शन पोर्टल' वर बघावा.)

मुंबई : ४०० ०२० सही/-

दिनांक :- ३ जून, २०१७ कुलसचिव